सकाळ ५-५-१९.

# जेवणाचे डबे देत बनली पोलिस कर्मचारी

**प्रकाश लिमये**, भाईंदर

**एखादी जिद्द उराशी बाळगली आणि त्यादिशेने प्रयत्न केले तर यश नक्कीच पदरात पडते. पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जेवणाचे डबे पोचवताना आपणही एक दिवस पोलिस व्हायचे हे स्वप्न बघितलेल्या राणी हरसुले हिच्या बाबतीतही नेमके हेच घडले. नुकत्याच पार पडलेल्या पोलिस भरतीत भाईंदरच्या राणी हरसुले हिची पोलिस शिपाई या पदावर निवड झाली. तिने त्यासाठी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक होत आहे.**



भाईंदर : नवघर पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनीही राणी हरसुले हिचे कौतुक केले.

राणीच्या घरचा केटरिंगचा व्यवसाय. वडिलांनी अलीकडेच बॅंकेतून स्वेच्छानिवृत्ती घेतली. आई गेल्या पंधरा वीस वर्षांपासून जेवणाचे डबे बनविण्याचे कामही करत आहे. तिच्या या कामात अगदी शाळेत असल्यापासून राणी मदत करायची. चौथ्या इयत्तेत असल्यापासून जवळच असलेल्या नवघर पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना ती आणि तिचा मोठा भाऊ दररोज जेवणाचे डबे देण्याचे काम करत असत. सतत पोलिस ठाण्यामध्ये जात असल्यामुळे आणि पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद होत असल्याने राणीच्या मनात खाकी वर्दीविषयी विशेष ओढ निर्माण झाली. खाकी वर्दीतील पोलिस, त्यांची काम करण्याची पद्धत, पोलिस ठाण्यात येत असलेल्या निरनिराळ्या व्यक्तींच्या समस्या सोडविण्यासाठी ते घेत असलेली मेहनत ती दररोज जवळून पाहत असे. त्यातूनच तिलाही अगदी लहान वयातच पोलिस व्हावे असे वाटू लागले. तसे ती पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना बोलूनही दाखवत असे.

शालेय शिक्षण संपून महाविद्यालयात दाखल झाल्यानंतरही ही ओढ कायम राहिली. महाविद्यालयात असताना ती कबड्डी, कॅरमसारख्या खेळांमध्ये विद्यापीठ स्तरापर्यंत सहभागी झाली. धावणे, व्यायाम, योगाभ्यास याचीही तिला आवड होतीच. मात्र अभ्यास व कामामुळे त्यात ती जास्त प्रगती करू शकली नाही. मात्र खेळाचा व व्यायामाचा तिला पोलिस भरतीसाठी खूपच फायदा झाला. महाविद्यालयीन शिक्षण संपल्यानंतर तिने पोलिस सेवेत भरती होण्यासाठी जास्तीत जास्त माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. त्यासाठी ती शिकवणी वर्गालाही जाऊ लागली. तिने या मेहनतीच्या जोरावर आपले पोलिस व्हायचे स्वप्न पूर्ण केले आहे.

निवडीमुळे लहानपणापासून पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले. मात्र मला याठिकाणीच थांबायचे नाही तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन पोलिस अधिकारी व्हायचे आहे, आणि समाजाची सेवा करायची आहे. असे मनोगत राणी हरसुले हिने व्यक्त केले आहे.

## पोलिसांकडून कौतुक

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाकडून पोलिस भरती जाहीर करण्यात आली. या भरतीमध्ये घेण्यात येत असलेल्या शारिरिक चाचणीची तिने माहिती घेतली व त्याचा सराव सुरू केला. लेखी परीक्षेची तयारी देखील केली. तिच्या या मेहनतीचे अखेर चीज झाले व तिची नुकतीच पोलिस शिपाई म्हणून निवड झाली. तिने दाखवलेल्या जिद्दीचे व मिळवलेल्या या यशाचे नवघर पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनीही कौतुक केले आहे.

## शेतकऱ्याची मुलगी बनली पोलिस कर्मचारी

बोईसर (बातमीदार) : घरची परिस्थिती हालाखीची असल्याने मुलांना शिकवावे कसे आणि पोटाची खळगी भागवावी असा प्रश्न ज्या कुटुंबाला सतत पडलेला असायचा अशा एका कुटुंबातील मुलगी आज पोलीस कर्मचारी बनली आहे. पालघर जिल्ह्यातील ब्राह्मणपूर गावातील अमिशा घनश्याम पाटील हिची पोलिस कर्मचारी म्हणून निवड झाली आहे. पोलिस बनून शासकीय नोकरी करायची हे स्वप्न उराशी बाळगणारी अमिशा पाच वर्ष पोलिस भरतीसाठी प्रयत्न करत होती. आता तिची निवड मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयात पोलिस कर्मचारी म्हणून झाली आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा.नं.५.

# मिरा-भाईंदरमध्ये सुद्धा झळकले अजित पवारांचे बॅनर

## राजकारणाने वेगळे वळण घेतल्याची चर्चा

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात मुख्यमंत्री बदलाचे वारे वाहत असतानाच ठिकठिकाणी भावी मुख्यमंत्री म्हणून राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांची बॅनरबाजी होत आहे. अशा स्वरूपाचे बॅनर मिरा-भाईंदर शहरातही शनिवारी झळकल्याने शहरातून तळागाळाला गेलेल्या राष्ट्रवादीला यामुळे बळ मिळू लागल्याची चर्चा सुरु झाली आहे.

राज्यातील भाजप पुरस्कृत राजकारणाने वेगळे वळण घेतल्याची जोरदार चर्चा जनमानसात सुरु झाली आहे. शिवसेनेला तोडून बाळासाहेबांच्याच नावाने एकाच पक्षधार्जिण्यांचे दोन पक्ष उदयाला आले आहेत. बाळासाहेबांच्या शिवसेनेचे नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या कमळावर स्वार होऊन मुख्यमंत्री पद मिळविले. यासाठी त्यांना शिवसेनेच्या ५० आमदारांचे बळ मिळाल्याचे सर्वश्रुत असले तरी मुख्यमंत्र्यांसह काही आमदारांच्या अपात्रतेचा मुद्दा सध्या राज्यात गाजत आहे. यावर भाष्य करणाऱ्या राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी ते आमदार अपात्र ठरले तरी भाजपच्या सत्तेला धोका नसल्याचा निर्वाळा देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. यामुळे पवार यांच्या राजकारणाचा गंध कमळात दरवळू लागल्याची चर्चा सुरु झाली आहे.

दरम्यान भाजपच्या राजकारणावर नाराज झालेले मुख्यमंत्री आपल्या दरे खांव या गावी उन्हाळी सुट्टीसाठी गेल्याचे सांगण्यात येत आहे. उन्हाळी सुट्टीसाठी मुख्यमंत्री आपल्या गावी जाण्याची हि पहिलीच वेळ असल्याची बोलले जात आहे. या ग्रीष्मकालीन सुट्टीत त्यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह भेटणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र शाह यांनी देखील शिंदे यांना भेटणे टाळल्याची चर्चा सुरु झाली आहे. त्यात शिंदे यांच्यावर भाजपचे नेते नाराज असल्याचे बोलले जात असल्याने मुख्यमंत्री बदलाचे वारे सध्या राज्यात वाहू लागले आहेत.

### शहरातून नेस्तनाबूत होत असलेल्या राष्ट्रवादीला मिळतेय बळ

या मुख्यमंत्री बदलाच्या वाऱ्यात पवार यांच्या नावाचा उदोउदो होत असून त्यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून ठिकठिकाणी बॅनरबाजी होऊ लागली आहे. पवार हे मुख्यमंत्री पदावर विराजमान होण्याची अटकळ केली जात असतानाच भाजपने अलिकडील काळात राष्ट्रवादीवर टीका करणे सोडले कि काय, असा संशय यऊ लागला आहे. हे समीकरण हेरून मिरा-भाईंदरमध्ये देखील राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार व नेते अजित पवार यांच्याशी जवळीक असलेले माजी नगरसेवक आसिफ शेख यांनी पवार यांचे मुख्यमंत्री पदाचे भावी दावेदार असल्याचे बॅनर शहरात लावल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे शहरातून नेस्तनाबूत होत असलेल्या राष्ट्रवादीला काहीसे बळ मिळू लागल्याचे बोलले जात आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पु.५ता.७.

# समुद्रकिनारा परिसरात संशयित व्यक्तींची तपासणी

## भारतीय नौदल सेनेने राबवली मोहीम, मुख्य रस्त्यावर नाकाबंदी

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर सई-विरार पोलीस आयुक्तालय द्दीत भारतीय नौदल सेनेकडून ागरी सुरक्षा अभियान फिशरीज, हाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड, कस्टम, कोस्टगार्ड इत्यादी विभागांशी समन्वय राखून सागरी सुरक्षेच्या अनुषंगाने अभियान राबवण्यात आले. समुद्रमार्गाने होणाऱ्या संशयित हालचाली, तसेच समुद्रकिनारा भागातील परिसरात वावरणाऱ्या संशयित व्यक्तींची पोलिसांतर्फे मोठ्या प्रमाणात तपासणी करण्यात येत आहे.



मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत मनुष्यबळाचा वापर करत सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून शहरात सर्वत्र समुद्रकिनारी पोलीस बंदोबस्त लावत मुख्य रस्त्यावर नाकाबंदी करण्यात आली. समुद्रीमार्गे दहशतवादी हल्ला करण्याच्या उद्देशाने शहरात कुणी प्रवेश करू नये, यासाठी सागरी कवच अभियान राबवण्यात येते. हे अभियान गुरुवारी सकाळी ६ पासून ते शुक्रवार रात्रीपर्यंत राबवण्यात आले. यावेळी वाहतूक करणाऱ्या वाहनांची व संशयित व्यक्तींची तपासणी करण्यात आली. या अभियानात आयुक्तालयातील एकूण १७१ पोलीस अधिकारी, ५९३ पोलीस अंमलदार, ७५ महाराष्ट्र सुरक्षा बल व ३४ होमगार्ड जवान, ७५ सागर रक्षक दल, तीन पोलीस पाटील व सहा सागरी बोट, चारचाकी वाहने व दुचाकीद्वारे चेकिंग व नाकाबंदी करण्यात आली.

यावेळी आयुक्तालय हद्दीत नाकाबंदी करत असणारे पोलीस त्यांचे कर्तव्य योग्यरीत्या पार पाडत आहेत का, याचीदेखील वरिष्ठांकडून तपासणी केली जाते. अभियानादरम्यान गस्त घालणारे पोलीस जागरूक आहेत का, हे बघण्यासाठी खोटे दहशतवादी, चोर बनून नाकाबंदी असणाऱ्या मार्गाने वाहनांमधून, बोटीतून पाठवले जातात. सागरी सुरक्षा अभियानाअंतर्गत पोलीस

### समुद्रात पोलिसांची बोटीतून गस्त

अभियानात समुद्रीमार्गे एखादा दहशतवादी येताना दिसला तर कशाप्रकारे त्याला रोखावे, याचीसुद्धा माहिती देण्यात येते. त्याचबरोबर समुद्रात मासेमारीसाठी बोट घेऊन जाणाऱ्या मच्छीमारांनाही एखादी अनोळखी बोट समुद्रात संशयास्पद दिसल्यास पोलिसांना कळवावे व दक्षता घ्यावी, अशी जनजागृती केली जाते. पोलीस स्वतः बोटीमधून समुद्रात गस्त घालतात.

नाकाबंदीदरम्यान संशयित वाहनांची तपासणी करत त्यांची शहानिशा केल्यानंतर त्यांना सोडण्यात येते. मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय हद्दीत उत्तन सागरी पोलीस ठाणे हद्दीत वेलंकणी, गोराई, वसई-विरारमध्येही समुद्र किनारपट्टी आहे. यामुळे समुद्रीमार्गे शहरात सहज प्रवेश करण्यास दहशतवाद्यांना सोपे असते. याठिकाणी नेहमीच पोलीस गस्त घालतात.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा.नं.५

# पाच दिवसांत २०६ जणांना अटक

## अमलीपदार्थाविरोधात मुंबई पोलिसांची विशेष मोहीम

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** अमलीपदार्थ विरोधी कक्षाने (एएनसी) मुंबईत राबवलेल्या विशेष मोहिमेत शुक्रवारी तीन वेगवेगळ्या कारवायांमध्ये ४० लाख रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. माहीम पश्चिम येथे दोन ठिकाणी व गोरेगाव येथे ही मोहीम राबवण्यात आली. त्यात १९५ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) जप्त करण्यात आले. तर, मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांतर्गत गेल्या पाच दिवसांत राबवण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत अमलीपदार्थ कायद्यांतर्गत १६१ गुन्हे दाखल करून २०६ जणांना अटक करण्यात आली.

वरळी कक्षाने शुक्रवारी गोरेगांव येथील संतोषनगर परिसरात संशयावरून दोन व्यक्तींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ७५ ग्रॅम एमडी



जप्त करण्यात आले. त्याची किंमत १५ लाख रुपये आहे. तिन्ही आरोपींना अमलीपदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत अटक करण्यात आली. दुसऱ्या कारवाईत एएनसीच्या घाटकोपर कक्षाने माहीम पश्चिम येथील कासालुना इमारतीजवळून ६८ ग्रॅम एमडीसह २४ वर्षीय तरुणाला पकडले. त्याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या एमडीची किंमत १३ लाख ६० हजार रुपये आहे. याप्रकरणी घाटकोपर कक्षात अमलीपदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली. तिसऱ्या कारवाईत वांद्रे कक्षाने सायन-माहीम जोडरस्ता येथून दोन तरुणांना ५२ ग्रॅम एमडीसह ताब्यात घेतले. त्यांच्याकडे जप्त करण्यात आलेल्या एमडीची किंमत १० लाख ४० हजार रुपये आहे. याप्रकरणी वांद्रे कक्षात अमलीपदार्थ प्रतिबंधक कायद्याच्या कलम ८ (क) सह २२ (क), २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपी २१ व २८ वर्षांचे असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याशिवाय पोलीस स्थानकांच्या पातळीवर अमलीपदार्थांचे गुन्हे दाखल असलेल्या अभिलेखावरील आरोपींची नियमित तपासणी सुरू करण्यात आली असून शुक्रवारी ४६७ आरोपींची तपासणी करण्यात आली. याशिवाय ४६ गुन्ह्यांमध्ये ४८ जणांना अटक करण्यात आली. या कारवाईत एमडी, गांजा, कोडेन व हेरॉईन आदी अमलीपदार्थ जप्त करण्यात आले. गेल्या पाच दिवसांत या कारवाई अंतर्गत अमलीपदार्थ कायद्यांतर्गत १६१ गुन्हे दाखल करून २०६ जणांना अटक केली.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा. नं. ५.

# वज्रमूठ सभा यशस्वी करण्यासाठी जय्यत तयारी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई ईकाँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप यांनी सभास्थळी तयारीचा आढावा घेतला.**

**मुंबई :** भाजप -आणि शिंदे सरकारच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली वज्रमूठ सभा वांद्रे-कुर्ला संकुलात महाराष्ट्रदिनी होणार आहे. सभा यशस्वी करण्याकरिता शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादीने ताकद पणाला लावली आहे. प्रत्येक पक्षाकडून दोन वक्ते असले तरी काँग्रेसकडून कोण बोलणार यांची अधिकृत नावे जाहीर करण्यात आलेली नाहीत.

छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरनंतर तिसरी जाहीर सभा महाराष्ट्रदिनी सायंकाळी वांद्रे-कुर्ला संकुलात होणार आहे. शिवसेनेच्या बालेकिल्ल्यात ही सभा असल्याने ठाकरे गटाने ही सभा यशस्वी करण्याकरिता जास्तीत जास्त गर्दी कशी होईल यासाठी लक्ष दिले आहे. मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप यांनीही जास्तीत जास्त लोक जमा करण्यावर जोर दिला आहे.

नागपूर आणि छत्रपती संभाजीनगरपेक्षा मुंबईतील सभा अधिक मोठी करण्याचा तिन्ही पक्षांचा निर्धार आहे. राष्ट्रवादीचे पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी मुंबईच्या सभेला उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, असा ठाकरे गटाचा प्रस्ताव होता. पण पवार हे राज्यपातळीवरील मेळाव्यांना उपस्थित राहणार नाहीत.

प्रत्येक पक्षाकडून दोनच वक्त्यांनी भाषणे करावीत, असा निर्णय घेण्यात आला आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे प्रमुख भाषण होते. नागपूरच्या सभेत विरोधी पक्षनेते अजित पवार हे उपस्थित असूनही पक्षाने जयंत पाटील आणि अनिल देशमुख यांना संधी दिली होती. अजितदादांनी बोलण्याचे टाळल्याने त्याचे वेगवेगळे तर्कवितर्क काढण्यात आले होते. सोमवारच्या सभेत छगन भुजबळ व जितेंद्र आव्हाड यांना संधी दिली जाईल. मात्र जर अजित पवार भाषण करणार असतील तर यापैकी एकच वक्ता असेल.

काँग्रेसमध्ये मुंबईचे अध्यक्ष म्हणून भाई जगताप यांना संधी दिली जाईल. याशिवाय माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले जाईल, असे सांगण्यात येते. मुंबईत दोनऐवजी तिघांना प्रत्येक पक्षाने संधी द्यावी, अशीही चर्चा सुरू असल्याचे समजते.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पा.नं.२.

# श्रद्धा हत्याकांड : आफताबवरील आरोप निश्चितीचा निर्णय लांबणीवर

**। नवी दिल्ली :** लिव्ह इन पार्टनर श्रद्धा वालकरच्या हत्येचा आरोपी आफताब पूनावाला याच्याविरोधात आरोप निश्चित करण्यासंदर्भातील शनिवारी होणारा निर्णय दिल्लीतील सत्र न्यायालयाने पुढे ढकलला आहे. या प्रकरणी न्यायालयाकडून आता येत्या ९ मे रोजी निर्णय घेतला जाणार आहे.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश विशाल पाहुजा यांनी या प्रकरणाशी संबंधित न्यायाधीश सुटीवर असल्याचे सांगत प्रकरण स्थगित केले. अतिरिक्त सत्र न्यायाधीश मनीषा खुराना कक्कड यांनी १५ एप्रिल रोजी आरोपांवरील युक्तिवाद पूर्ण झालयानंतर आदेश २९ एप्रिलसाठी राखीव ठेवला होता. यादरम्यान श्रद्धाच्या वडिलांनी अंतिम संस्कारासाठी आपल्या मृत मुलीच्या अस्थी देण्याची विनंती करणाऱ्या याचिकेवरील सुनावणी ९ मेपर्यंत स्थगित केली होती, तर या विनंतीवर दिल्ली पोलीस पुढील सुनावणीवेळी आपली भूमिका मांडली जाण्याची शक्यता आहे.




दिल्लीतील मेहरौली परिसरातील एका फ्लॅटमध्ये लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या आफताबने आपली लिव्ह इन पार्टनर श्रद्धाची हत्या केली. त्यानंतर तिच्या मृतदेहाचे सुमारे ३५ तुकडे करून ते तीन आठवडे फ्रीजमध्ये ठेवले. यानंतर एकेक करून या तुकड्यांची विल्हेवाट लावली. आफताबने पोलिस चौकशीत आपला गुन्हा कबूल केला आहे. दिल्ली पोलिसांनी या प्रकरणी २४ जानेवारी रोजी ६६२९ पानांचे आरोपपत्र दाखल केले होते.

म.टा.पा.नं.३.

# विनाहेल्मेट सरकारी कर्मचाऱ्यांवर बडगा

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**



दुचाकी चालवताना हेल्मेट वापरण्याचा नियम आहे. मात्र मंत्रालय, वाहतूक पोलिस आणि अन्य सरकारी विभागांतील कर्मचारी 'स्टाफ' असे सांगून कारवाईतून पळवाट काढतात. या कर्मचाऱ्यांना आता कारवाईला तोंड द्यावे लागणार आहे. सरकारी कर्मचाऱ्यांनी हेल्मेट न वापरल्यास दोषी कर्मचाऱ्यांसह त्यांच्या विभागप्रमुखांवर कारवाई करण्यात येणार आहे.

केवळ सरकारी कर्मचारी नव्हे, तर सर्वच दुचाकीस्वारांनी हेल्मेट वापरून गाडी चालवणे अपेक्षित आहे. याबाबत राज्यातील सर्वच प्रादेशिक परिवहन कार्यालयांना कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरक्षेसंबंधी परिवहन विभागाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांसह त्यांच्या विभागप्रमुखांवरदेखील कारवाई करावी, असे राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी स्पष्ट केले. मोटार वाहन कायदा, कलम १२९नुसार दुचाकीस्वार, सहप्रवासी यांना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक आहे. वाहन उत्पादक कंपनीने दुचाकी खरेदी करणाऱ्या ग्राहकाला वाहनासोबत हेल्मेट देणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात या दोन्ही नियमांचे पालन होत नसल्याने दुचाकी अपघातांत जखमी-मृतांच्या संख्येत वाढ होत आहे.

मुंबई पोलिसांच्या वाहतूक विभागाने जून २०२२मध्ये मुंबईत दुचाकी चालवणाऱ्यासह मागे बसलेल्या व्यक्तीलादेखील हेल्मेट परिधान करण्याची सक्ती केली होती. नियमभंग करणाऱ्या दुचाकीस्वारांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, अशा सूचना तत्कालीन पोलिस आयुक्त संजय पांडे यांनी दिल्या. त्यानुसार थोडे दिवस कारवाई झाली आणि नंतर ती कारवाई बारगळली. सध्या शहर-उपनगरात मोठ्या प्रमाणात दुचाकीस्वार, सहप्रवासी हेल्मेटविना प्रवास करताना दिसतात.

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ५

# मुंबई महापालिकेकडून मिरा-भाईंदरची बोळवण

## १.५ द. लि. पाण्याऐवजी केवळ ०.५ द. लि. पाणीपुरवठा

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर शहरात म्हाडाने बांधलेल्या गृहप्रकल्पांना पाणीपुरवठा करण्यासाठी मुंबई महापालिकेकडून मिरा-भाईंदरला दररोज १.५ दशलक्ष लीटर पाणी देण्याचे २०१४ मध्ये मान्य केले. मात्र गेल्या ९ वर्षांपासून मुंबई पालिकेने मिरा-भाईंदरला पाण्याचा एकही थेंब दिला नाही. यावर तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या दालनात १८ मे २०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीत पाटील यांनी दिलेल्या आदेशाचा अंमल करीत मुंबई महापालिकेने २१ मे २०२२ पासून मिरा-भाईंदरला १.५ दशलक्ष लीटर पाणी देण्यास सुरुवात केल्याचे सांगण्यात आले. मात्र मंजूर १.५ ऐवजी मुंबई पालिकेने मिरा-भाईंदरला केवळ सरासरी ०.५ दशलक्ष लीटरच पाणीपुरवठा करून मिरा-भाईंदर शहराची बोळवण केल्याचे समोर आले आहे.

उन्हाळ्यात मुंबई महापालिकेने मंजूर पाणीपुरवठ्यात मोठी कपात करीत मिरा-भाईंदर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी पाठपुरावा करणाऱ्या पालिका अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या तोंडाला पाने पुसल्याचेच स्पष्ट झाले आहे. मिरा-भाईंदर शहराला स्वत:चे जलस्त्रोत नसल्याने एमआयडीसीकडून १२५ व स्टेमकडून ८६ असा एकुण २११ दशलक्ष लीटर पाणीपुरवठा केला जात असला तरी एमआयडीसीकडून सरासरी १०० ते १०९ दशलक्ष लीटर पाणीच शहराला उपलब्ध होत आहे. शहराची लोकसंख्या सतत वाढत असताना त्यात शासकीय तसेच खासगी गृहप्रकल्पांची संख्या देखील वाढत आहे. येत्या दिड वर्षात शहराला पालघर जिल्ह्यातील सूर्य प्रकल्पातून २१८ दशलक्ष लीटर पाणी उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात येत असून यानंतर शहराला ५१ वर्षे पाणी कमी पडणार नसल्याचा दावा केला जात आहे. मात्र सध्याच्या उन्हाळ्यात पाणी समस्येमुळे शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

### मंजूर कोट्यापैकी ३० टक्केच पाणी



यानंतर मुंबई पालिकेने २१ मे २०२२ पासून मिरा-भाईंदरला पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केल्याचे मिरा-भाईंदर पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात आले. मात्र हे पाणी दररोज १.५ दशलक्ष लीटर ऐवजी ०.२५ ते ०.६१ दशलक्ष लीटरच दिले जात असल्याचे समोर आले आहे. यावरून शहराला केवळ ०.५ दशलक्ष लीटर म्हणजेच मंजूर कोट्यापैकी सरासरी सुमारे ३० टक्केच पाणी शहराला दिले जात असताना पालिकेचा पाणीपुरवठा विभाग त्यावर पांघरून घालून मूग गिळून बसला होता कि काय, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

> “ म्हाडाने आश्वासन दिल्याप्रमाणे २०१४ पासूनच मिरा-भाईंदर शहराला मुंबई महापालिकेच्या माध्यमातून १.५ दशलक्ष लीटर पाणी मिळणे अपेक्षित होते. मात्र काही थकीत रक्कमेकडे बोट दाखवून मुंबई महापालिकेने वेळकाढूपणा केला. हे पाणी शहराला उपलब्ध होण्यासाठी मुंबई महापालिकेच्या निर्देशानुसार मिरा-भाईंदर महापालिकेने सुमारे ६५ लाख रुपये खर्च करून नवीन जलवाहिनीच्या क्रॉस कनेक्शनचे काम पूर्ण केले. यानंतर तब्बल ९ वर्षांनी पाणीपुरवठा सुरु करण्यात आला तो देखील सरासरी ३० टक्केच. हि बाब निंदाजनक असून मुंबई महापालिकेने किमान उन्हाळ्यात तरी मंजूर कोट्याप्रमाणे मिरा-भाईंदरला पाणीपुरवठा करून दिलासा देणे अपेक्षित आहे.
>
> **- धुवकिशोर पाटील**, माजी नगरसेवक

Scanned with CamScanner